क्रमांक ३११६ /ह-२
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २० फेब्रुवारी, २०२६.

:: प रि प त्र क : :

विषय :- सन्मा. विद्यमान विधानसभा/विधानपरिषद सदस्यांच्या फास्टॅगबाबत

सन्मा.विद्यमान विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना कळविण्यात येते की, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) मार्फत सर्व विद्यमान विधानमंडळ सदस्यांना पुरविण्यात येणाऱ्या फास्टॅग संदर्भातील ऑनलाईन पध्दतीने करावयाच्या नोंदणी प्रक्रियेसंदर्भात येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी व सदर नोंदणी प्रक्रियेसंदर्भातील मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) संबंधित काम पाहणारे कर्मचारी दिनांक २३ ते २८ फेब्रुवारी, २०२६ व दिनांक ९ ते १४ मार्च, २०२६ या कालावधीत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील "ह-२", कक्ष क्र.१६०४, १६ वा मजला येथे उपस्थित राहणार आहेत. फास्टॅगसंदर्भात मा.सदस्यांच्या काही अडचणी असल्यास मा.सदस्यांनी स्वत: अथवा त्यांचे अधिकृत स्वीय सहाय्यकांमार्फत पुढील कर्मचाऱ्यांशी १) श्रीमती भावना तवटी २) श्री.रमाकांत कांबळे ३) श्री.अक्षय भोईर दूरध्वनी क्र.२२०२७३९९ विस्तारित क्र.२५१२ वर थेट संपर्क साधावा.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) चे सदरहू कर्मचारी दिनांक २३ ते २८ फेब्रुवारी, २०२६ व दिनांक ९ ते १४ मार्च, २०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत उपरोक्त कक्षात उपलब्ध असतील.

डॉ.विलास आठवले
सचिव-३
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति : महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व विद्यमान सदस्य.

D:\D 13\2025\Vastag\panpatrak.docx